# एम.ए – IV – सेम – पेपर – ३ - दबाव गट आणि सामाजिक चळवळी

प्रा.डॉ.सुशांत चिमणकर

## UNIT – III – भारतातील सामाजिक चळवळी

दलित चळवळ – भारतीय समाजातील उपेक्षित, शोषित, पिडीत, पददलित जनतेच्या उद्धारासाठी सुरु करण्यात आलेली चळवळ म्हणजे दलित चळवळ होय. भारतीय समाजात परंपरेने अस्पृश्य जाती म्हणून ओळखल्या गेलेल्या जातींच्या लोकांना प्रामुख्याने 'दलित समाज' किंवा 'दलितवर्ग' असे संबोधले जाते. वास्तविक पाहता 'दलित' या शब्दाला कसलाही जातीय अर्थ किंवा संदर्भ नाही; हे या ठिकाणी प्रथम स्पष्ट केले पाहिजे. समाजातील अत्यंत दुर्लब व अन्याय, अत्याचार यांचे बळी ठरलेल्या घटकांना उद्देशून 'दलित' असा शब्दप्रयोग केला जातो. तेव्हा दलित या शब्दावरून विशिष्ट जातींचा अर्थबोध होण्याचे खरे तर काही कारण नाही. परंतु भारतीय समाजव्यवस्थेच्या वैशिष्टयपूर्ण रचनेमुळे त्या शब्दाला व्यवहारात काहीसा जातीय असा आशय प्राप्त झाला आहे. येथील पारंपारिक समाजव्यवस्थेत अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींच्या व्यक्ती याच सर्वात दुर्बल घटक होत्या. सामाजिक रचनेत त्यांना सर्वात कनिष्ट स्थान देण्यात आले होते. इतकेच नव्हे तर, त्यांना सर्व प्रकारच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. भारतीय समाजातील वरिष्ठ जातींच्या लोकांनी त्यांचे अनेक मार्गांनी वर्षानुवर्ष अमानुष शोषण चालविले होते. त्यांच्यावर अनेक प्रकारे कठोर निर्बंध लादण्यात आले होते; त्यामुळे हिंदू धर्माने तथाकथित अस्पृश्य ठरविलेल्या जातींच्या लोकांनाच 'दलित' असे संबोधले जाऊ लागले. यावरून अस्पृश्य जातींच्या उद्धारासाठी सुरु करण्यात आलेल्या चळवळीला 'दलित चळवळ' असे नामाभिधान प्राप्त झाले.

'दलित चळवळ' ही दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ होय. भारतीय समाजातील वरिष्ठ जातींनी दलितांवर वर्षोनुवर्षे जुलूम, अत्याचार चालविला होता; त्यामुळे दलितांचे जगणे असह्य बनले होते. या सर्व बाबींचा त्यांच्या जीवनावर झालेला सर्वात गंभीर परिणाम असा सांगता येईल की, आपणही इतरांप्रमाणे मानव आहोत आणि इतर मानवानाप्रमाने सन्मानाचे व प्रतिष्ठेचे जीवन जगण्याचा आपणासही अधिकार आहे, याचाच जणू येथील दलित बांधवाना विसर पडला होता. त्यांच्यावर कित्येक शतकांपासून जे धार्मिक संस्कार झाले होते. त्यातून आपल्या वाटयाला आलेले जीवन हा आपल्या नशिबाचा भाग आहे अशी त्यांची धारणा बनली होती; त्यामुळे त्याच्यावर होत असलेल्या

अन्यायाचा प्रतिकार करण्याची त्यांची इच्छाच मरून गेली होती. दलितांच्या बाबतीतील हे चित्र संपुर्णपणे बदलून टाकण्याचे क्रांतिकारक कार्य दलित चळवळीने केले. म्हणजे दलित चळवळीने दलितांना नवा आत्मविश्वास प्राप्त करून दिला. त्याचप्रमाणे तिने येथील दलितांना संघटीत करून आपल्या न्याय हक्कांसाठी लढण्याची जिद्द व इर्ष्या त्यांच्यात निर्माण केली. विसाव्या शतकात दलितांना जि सामाजिक व राजकीय प्रतिष्टा प्राप्त झाली आहे, त्याचे संपूर्ण श्रेय दलित चळवळीला जाते. कारण या चळवळीने दलितांमध्ये घडवून आणलेली जागृती आणि त्यांची बदलून टाकलेली मानसिकता यामुळेच हे परिवर्तन घडून येणे शक्य झाले.

शेतकरी चळवळ - भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यापासून येथील शेतकरी वर्गात असंतोष वाढू लागला होता. वासाहतिक शासनाच्या आर्थिक धोरणाचे भारतीय शेतीव्यवसायावर अत्यंत अनिष्ट परिणाम झाले होते. विशेषतः जमिनीवर प्रत्यक्ष राबविणाऱ्या किंवा स्वतः शेती पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने वासाहतिक शासनाच्या नीती अत्यंत मारक ठरली होती. इंग्रजी राज्यकर्त्यांच्या जमिनी महसूलविषयक धोरणामुळे सामान्य शेतकरी दारिद्र्याच्या खाईत लोटले गेले. त्यांच्यावर कर्जबाजारी होण्याची वेळ आली. शेतकऱ्यावर ओढवलेल्या या आपत्तीमुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाला. या असंतोषाचे उद्रेक जागोजागी अनेक वेळा झाले. त्यातूनच भारतात शेतकरी चळवळीचा पाया घटला गेला. एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय शेतकऱ्यांनी काही ठिकाणी सरकारविरुद्ध प्रत्यक्ष लढेही उभारले होते. या लढयात संघटीत चळवळीचे स्वरूप लाभले नव्हते. त्यांची दिशाही निश्चित ठरली गेली नव्हती;परंतु भारतीय शेतकरी आपल्यावर होणारा अन्याय सदासर्वकाळ निमूटपणे सहन करीत नाहीत एवढे तरी त्यातून संबधीतांच्या निर्देशनात आले होते.

शेतकरी चळवळीचे राष्ट्रीय चळवळीशी नाते –

१. चंपारणमधील चळवळ – ई.स १९१७ मध्ये महात्मा गांधीनी बिहारच्या चंपारण जिल्ह्यातील निळीच्या मळयात काम करणाऱ्या शेतमजुरांच्या प्रश्नात लक्ष घटलेले. हे मले युरोपीय मळेवाल्यांच्या मालकीचे होते आणि त्यांच्याकडून शेतमजुरांचे प्रचंड शोषण केले जात होते. महात्मा गांधीनी शेतकऱ्याची स्थिती जाणून घेतली आणि अहिंसात्मक मार्गाने शेतकऱ्याची चळवळ सुरु केली. त्यामुळे तेथील शेतकऱ्याना न्याय मिळाला.

२. उत्तर प्रदेशातील शेतकरी चळवळ – उतर प्रदेशातल्या अवध, मुन्शीगंज, प्रतापगढ भागातील शेतकऱ्यानी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात चळवळ सुरु केली. ई.स १९१८ मध्ये उत्तर प्रदेशात किसान सभेची स्थापना झाली. अल्पावधीतच उत्तर प्रदेशातील अनेक भागात

किसानसभेच्या शाखा सुरु झाल्या. पुढे उत्तर प्रदेशच्या काही भागात कॉंग्रेसच्या नेतृत्वातखाली शेतकऱ्यानी 'एका चळवळ' सुरु केली.

गुजरात मधील शेतकरी चळवळ – ई.स १९१८ मध्ये गुजरातच्या खेडा जिल्ह्यातही शेतकऱ्यानी सरकारच्या विरोधात चळवळ सुरु केली. दुष्काळामुळे शेतकऱ्याच्या हाती कसलेही उत्पन आले नाही; परंतु अशा बिकट अवस्थेतही सरकारी अधिकाऱ्यानी सारावसुली सुरु ठेवली. सरकारने चालविलेल्या या अन्यायाविरुद्ध महात्मा गांधीनी चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेतला. या चळवळीतही शेतकरी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

बार्डोलीमधील करबंदीची चळवळ – ई.स १९२८ मध्ये गुजरातच्या सुरत जिल्ह्यातील बार्डोली तालुक्यात शेतकऱ्यानी कर बंदीची चळवळ सुरु केली. सरकारने जमीन महसुलात वेळोवेळी केलेल्या अन्याय वाढीविरुद्ध ही चळवळ सुरु करण्यात आली होती. या चळवळीचे नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेल यांनी केले.

किसान सभांची स्थापना – विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाचे एक वैशिष्ट असे सांगता येईल की, या काळात बंगाल, पंजाब, उत्तर प्रदेश या प्रांतात किसान सभा स्थापन झाल्या. किसान सभांच्या स्थापनेमुळे त्या त्या प्रांतातील शेतकऱ्यांना संघटीत करणे आणि त्यांच्यात जागृती घडवून आणणे शक्य झाले. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अनेक नेत्यांनी किसान सभांच्या कार्यात भाग घेतला; त्यामुळे शेतकरी चळवळ आणि राष्ट्रीय चळवळ यांच्यात निकटचे संबंध प्रस्थापित झाले.

शेतकरी चळवळीचा वाढता प्रभाव – ई.स १९३० नंतर देशातील शेतकरी चळवळीना विशेष जोर चढला. या वेळेपर्यंत शेतकऱ्यामधील काही घटकांना तरी आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली होती. आपल्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणावयाची असेल तर संघटीत झाल्याशिवाय दुसरा पर्याय नाही हे त्यांच्या लक्षात आले होते. त्यामुळे शेतकऱ्याना संघटीत करण्यासाठी सुरु झालेल्या प्रयत्नांना त्यांच्याकडून अनुकूल प्रतिसाद मिळत गेला. या कालखंडात स्वामी सहजानंद सरस्वती, कार्यानंद शर्मा, स्वामी रामानंदतीर्थ, एन. जी.रंगा, मौलाना अब्दुल, हमीदखान भाषानी, मोतीलाल तेजाव्त, स्वामी विद्यानंद इत्यादी नेत्यांनी शेतकरी चळवळीचे नेतृत्व केले. शेतकऱ्याचे हे लढे जमीनदार, सावकार व सरकार यांनी चालविलेल्या अन्यायाविरुद्ध होते.

## UNIT – IV – सामाजिक चळवळी आणि लोकतांत्रिक प्रक्रिया

आधुनिक समाजात आणि समाज जीवनात 'चळवळ' हे अविभाज्य अंग असल्याचे मानण्यात आलेले आहे. विशिष्ट ध्येयाने किंवा उद्दिष्टाने प्रेरित होऊन सामुहिकपणे केलेल्या प्रयत्नातून चळवळीचा उदय आणि विकास होतो. ज्या ठिकाणी समाज हा मुक्त स्वरूपाचा असतो अशा ठिकाणी चळवळीचे प्रमाण जास्त असते. हुकुमशाही राजवटीपेक्षा लोकशाही शासनपद्धतीत चळवळीची संख्या अधिक असते. कोणतीही चळवळ ही समाजजीवनाशी निगडीत असते. समाजात आणि समाजजीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने सामूहिकरीत्या केलेले प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय. सामाजिक चळवळी केवळ समाजातील विशिष्ट घटकांचे भले व्हावे या उद्देशाने सुरु होत असल्या तरी प्रस्थापित राजकीय व्यवस्थेकडून लोकहितासाठी जे कार्यक्रम तयार केले जातात त्यावर सामाजिक चळवळीचा प्रभाव पडतो. राजकीय मुद्दे व सार्वजनिक धोरणाच्या निश्चितीत सामाजिक चळवळीची असलेली भूमिका पुढील प्रमाणे –

१.लोकशाही प्रक्रियेत दबाव गट – समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रश्नाच्या निवारणासाठी किंवा समाजिक परिवर्तनासाठी समाजिक परिवर्तनासाठी सामाजिक चळवळी उभारल्या जातात. अशा चळवळीची शासनसंस्थेस तसेच राजकीय पक्षांनाही या चळवळीची म्हणजेच या चळवळीमागे असलेल्या लोकभावनेची दखल घ्यावीच लागते आणि त्याप्रमाणे आपल्या कार्यक्रमपत्रिकेत बदल करावे लागतात. भारतातही याचा प्रत्यय येतो. उदा. महागाई विरोधात अनेकदा जनआंदोलने केली जातात कारण महागाई हा विषय नागरिकांच्या दैनदिन जीवनाशी निगडीत आहे. महागाईमुळे लोकांच्या राहणीमानावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे वाढत्या महागाईच्या विरोधात जनक्षोभ उफाळून येतो व लोक महागाईच्या विरोधात आंदोलनाचा मार्ग पत्करतात. राजकीय पक्षही जनतेचेच प्रतिनिधित्व करत असल्याने त्यांना लोकभावनेची दखल घ्यावीच लागते. त्यामुळे सर्वच प्रमुख पक्ष महागाई विरोधात आवाज उठवताना दिसतात. त्याचबरोबर बहुतेक सर्व पक्षांच्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये महागाईच्या नियंत्रणाचे किंवा महागाई कमी करण्याचे अभिवचन दिले जाते.

अशाप्रकारे लोकांशी निगडीत विषय आपल्या कार्यक्रम पत्रिकेवर घेऊन राजकीय पक्ष आपण लोकांच्या भावनांचा आदर करतो त्याचबरोबर लोकांच्या प्रश्नांची आपल्याला जाणीव असल्याचे दर्शवून जनतेच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच जनतेमार्फत वेळोवेळी जि आंदोलने केली जातात

त्यांचे समर्थन करून आपल्या पक्षाच्या कार्यक्रम पत्रिकेवर ते विषय समाविष्ट करण्याबाबत सर्व राजकीय पक्ष आग्रही असतात.

## लोकशाही प्रक्रियेत दबाव गटाचे योगदान –

भारतातील आणि महाराष्ट्रातील दबाव गटांचा आढावा घेतला असता असे म्हणता येईल की दबाव गटाच्या कार्यामुळे शासनांकडून विविध स्वरुपाची कल्याणकारी कार्य घडून येतात. दबाव गट शासनाला आर्थिक, समाजिक, शैक्षणिक कार्याची जाणीव आणि जबाबदारी समजावून देण्याची भूमिका पार पडतात. उद्योगपती, व्यापारी,शेतकरी, कर्मचारी, कामगार, शिक्षक, विद्यार्थी, महिला अशा विविध वर्गाचे हितसंबध जोपासून समाजव्यवस्थेत समतोल साधण्याचे कार्य शासनाला करावे लागते. ज्या हितसंबधी गटाकडे शासनाचे दुर्लक्ष होते त्या गटाकडून शासनावर दबाव आणला जातो आणि शासनाला जागे केले जाते. राज्याच्या प्रशासनात सतत्य, कार्यक्षमता आणि स्थैर्य निर्माण करण्यासाठी दबाव गटांची नितांत आवश्यकता असते. अर्थात, दबाव गटांचा प्रभाव हा त्यांच्या स्वरूपावर आणि कार्यावर अवलंबून असतो. दबाव गटाचा आकार, दबाव गटाकडे असणारी साधनसामग्री, दबाव गटाचे उद्दिष्टे, सामर्थ्य आणि नेतृत्व, दबाव गटाची कार्यपद्धती इत्यादी गोष्टीवर दबाव गटाची परिणामकारकता अवलंबून असते. भारतातील कामगार संघ, व्यापारी संघटना, विद्यार्थी संघटना, कर्मचारी संघटना, या आकाराने मोठया असून त्यांच्याकडे विपुल साधनसामुग्री असते. हितसंबध गट जेवढे आर्थिकदृष्ट्या संपन्न असतात तेवढे ते शासनावर अधिक प्रभाव पाडू शकतात. उदा. व्यापारांचा समूह, उद्योगपतींची संघटना,साखर संघ अशा संघटना आर्थिक संपन्नतेमुळे प्रचार व प्रसार साधनांचा विपुल प्रमाणात वापर करू शकतात. त्यामुळे त्या संघटना अधिक प्रभावी ठरतात.

## जागतिकीकरणात दबावगट आणि सामाजिक चळवळचे भवितव्य आणि आव्हाने –

जागतिकीकरणाच्या युगात दबाव गट आणि सामाजिक चळवळीपुढे आव्हाने खूप मोठया प्रमाणात असल्याचे दिसते. सरकारच्या सार्वजनिक धोरणात सामाजिक चळवळीची भूमिका अत्यंत महत्वाची मानली जाते. एखादा कायदा बदलविणे किंवा रद्द करणे यावर सामाजिक चळवळीची भूमिका अत्यंत महत्वाची मानली जाते. ज्या कायद्यामुळे जनसामान्यांच्या हक्कांवर गदा येईल असे कायदे तयार करण्याला सामाजिक चळवळीच्या माध्यामतून विरोध केला जातो. अमेरिके सारख्या देशात दबाव गटांकडून राजकीय पक्षांना प्रचंड प्रमाणात पैसा पुरविला जातो. दबाव गटांना प्रभावी व कुशल नेतृत्व

लाभले तर दबाव गट अधिक चांगल्याप्रकारे शासनावर प्रभाव पाडू शकतात. पश्चात राष्ट्रात दबाव गटांना जेवढे महत्व दिले जाते तेवढे महत्व मर्यादित आहे. अजूनही भारतीय राजकरणात दबाव गटाचे कार्य मर्यादित आहे. वास्तविक प्रशासनात स्थेर्य, सातत्य आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी दबाव गटाची आवश्यकता असते. प्रे. जॉर्ज बुश यांनी २००० च्या नॅशनल रायफल असोसिएशनने घेतला व आपला बंदूकविषयक अधिकार कायम राहील, बुश सरकारकडून बंदूक विषयक कायद्यात कोणताही हस्तक्षेप करणार नाही असे अभिवचन घेतले. बुश यांनी निवडून आल्यानंतर बंदुकांनी हिंसा कमी करण्याच्या धोरणाऐवजी गुन्हेगाराना पकडण्याचे धोरण स्वीकारले. मार्टिन ल्युथरने किंग प्रस्थापित शासनाच्या विरोधात प्रचार मोहीम हाती घेतली होती. मार्टिन ल्युथर किंगच्या या धोरणाला अमेरिकेतील श्वेतवर्णियानी पाठिंबा देलेला होता. याचा शासकीय धोरणावर परिणाम झाला.

ज्यावेळी एखादा राजकीय मुद्दा अंतर्गत व आंतराष्ट्रीय स्तरावर राबविण्याचा निर्णय घेतला जातो त्यावेळी समाजातील घटकांचा या धोरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कशा प्रकारचा आहे याचा विचार करावा लागतो. तसेच सार्वजनिक धोरणांची निर्मिती करतांना देशातील सर्वसामान्य जनतेचा विचार करावा लागतो. थोडक्यात राजकीय मुद्दे आणि सार्वजनिक धोरणाच्या निश्चितीमध्ये समाजातील विविध घटकांकडून कशा प्रकारचा प्रतिसाद येतो, धोरणाप्रती समाजिक चळवळीची भूमिका कशा प्रकारची आहे याचा विचार प्रस्थापित शासनाला करावा लागतो.

---

संदर्भ –

१. राज्यशास्त्र (पेपर पहिला) – प्रा.व्ही.बी.पाटील, प्रा.चिं.ग.घांग्रेकर आणि के सागर, के सागर पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती १ मे २०११.

२. भारतीय शासन आणि राजकारण – बी.बी.पाटील – फडके प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९९.

३.भारतीय शासन आणि राजकारण – रा.ज.लोटे – पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर, प्रथम आवृत्ती जून २००३.

४. सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांताचा कोश – राज्यशास्त्र – डॉ.बी.आर. जोशी – डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती जानेवारी २००७.

५. भारतीय शासन आणि राजकारण – डॉ.अलका देशमुख – साईनाथ पब्लिकेशन नागपूर – प्रथम आवृत्ती २००१५